संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# राजकीय ध्रुवीकरणासाठीच जागेची खेळी

**रामजन्मभूमी** परिसरातील अविवादित जागा मंदिर बांधण्यासाठी त्या त्या मालकांना मिळावी अशा आशयाची याचिका केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल करणे याचा अर्थ २०२५ पर्यंत मंदिर बांधून पूर्ण करण्याची सरकारची योजना दिसून येते. लोकसभा निवडणुकीपूर्वी राममंदिर विषयक प्रश्नाला एक निर्णायक स्वरुप देण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न दिसून येतो. प्रामुख्याने यासंदर्भातील न्यायालयातली सुनावणी अपेक्षेपेक्षा खूपच रेंगाळली आहे. सर्वोच्च न्यायालय लोकसभा निवडणुकीपूर्वी यासंदर्भात काही ठोस निर्णय देईल अशी कोणतीही शक्यता दिसत नाही सरकारला तर म्हणजेच सत्ताधारी भाजपाला आपल्या सरकारने राम मंदिराबाबत काहीतरी पुढाकार घेतला हे दाखवून द्यायचे आहे. न्यायालयाच्या कचाट्यात न सापडता राममंदिर बांधकामाला या ना त्या पध्दतीने सुरुवात करण्याचा हा प्रयत्न दिसून येतो. खरे तर दोन वर्षापूर्वी सर्वोच्च न्यायालयानेच असे म्हटले होते की राम मंदिराबाबतचा प्रश्न हा दोन्ही पक्षांनी सामंजस्याने सोडवावा. त्यात न्यायालयाला खेचू नये. परंतु या दोन्ही पक्षांमध्ये पाहिजे तसे समन्वय होऊ शकलेला नाही. बाबरी मस्जिद कृती समितीच्या सदस्यांनी मंदिर बांधायला विरोध नसल्याचे म्हटले आहे. परंतु जी वादग्रस्त जागा आहे तिला धक्का लावू नये असे त्यांचे मत आहे. आणि विश्वहिंदू परिषद किंवा साधूसंत या सर्वांनी मंदिर वही बनायेंगे असा पुन्हा नारा देऊन त्या वादग्रस्त जागेवरच मंदिर उभारण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सरकारने लोकसभा निवडणुकीपूर्वी राम मंदिर विषयाला एवढे महत्व देण्यामागचा हेतू अतिशय स्पष्ट आहे. हिंदू मतदारांना खुश करण्याकरीता हा सगळा आटापीटा चाललेला दिसून येतो. परंतु त्यातला तोटाही तितकाच स्पष्टपणे लक्षात घ्यावा लागेल. सबका साथ सबका विकास अशी घाषणा देऊन देशातील सर्व मतदारांची सहानुभूती मिळवण्यात यशस्वी झालेल्या नरेंद्र मोदींना या निवडणुकीत राम मंदिर प्रश्नामुळे इतर मतांवर पाणी सोडण्याची वेळ येऊ शकते.

### केंद्राची राजकीय खेळी

यातला आणखी एक महत्वाचा भाग असा आहे की सरकारने आतापर्यंत राम मंदिराबाबत ज्या ज्या काही हालचाली केल्या त्याबाबत काँग्रेसकडून कोणतीही स्पष्ट प्रतिक्रिया किंवा विरोधाची प्रतिक्रिया आलेली नाही. आतादेखील सरकारने ही नवी याचिका दाखल केल्यावर काँग्रेसने कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. याचा अर्थ हिंदू मतदारांना दुखवण्याची काँग्रेसचीदेखील तयारी नाही. अर्थातच आगामी लोकसभा निवडणुकीत त्याचा मतदानावर परिणाम होऊ शकतो. विशेषतः उत्तरप्रदेश हा या लोकसभा निवडणुकीचा पुन्हा केंद्रबिंदू राहाणार आहे तिथे सत्तेतच असलेल्या योगी आदित्यनाथ यांच्या सरकारने उत्तरप्रदेशातील राजकीय वातावरणाचे यापूर्वीच ध्रुवीकरण केलेले आहे. आणि आता राम मंदिराच्या या नव्या मोहीमेमुळे केंद्रातील सरकारलाही असेच ध्रुवीकरण अपेक्षित दिसून येते. याचा अर्थ राममंदिराचा मुद्दा उपयोगात आणून यावेळच्या लोकसभा निवडणुकीत मतांच्या ध्रुवीकरणाचा मोठा खेळ खेळला जाईल. याबाबत सरकारने घेतलेला जागा अधिकरणाबाबतचा पुढाकार काँग्रेससाठी राजकीय अडचणीचा ठरावा असादेखील त्यामागचा तितकाच मोठा राजकीय डावपेचही दिसून येतो. यामागचे कारणही तसेच महत्वाचे असून उत्तरप्रदेशात समाजवादी पार्टी आणि बहुजन समाजवादी पार्टीने केलेली युती भाजपासाठी आव्हान ठरण्याची शक्यता आहे. तर काँग्रेसच्या नेतृत्वाखालील गटबंधनामुळे उत्तरप्रदेशातील राजकीय समिकरण काहीसे बदलल्यासारखी परिस्थिती आहे. या सर्वांवर मात करणारी आणि २०१४ प्रमाणे अधिकाधिक जागा जिंकण्याची व्यूहरचना खेळल्याशिवाय पर्याय नाही असे भारतीय जनता पार्टीला वाटत आहे. आता प्रश्न एवढाच आहे की न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेला न्यायालयाकडून काय उत्तर मिळते यावर बरेच काही अवलंबून राहील. न्यायालयाने सदर जागेसाठी परवानगी देण्यास नकार दिला आणि आहे तीच परिस्थिती कायम ठेवण्याचा आदेश दिला. तर पुन्हा एकदा हिंदू मतांचे आपोआपच अधिक एकत्रिकरण होईल आणि कोर्टाचा तो निर्णयसुध्दा भाजपाच्या ध्रुवीकरणाच्या राजनीतीला पोषकच ठरू शकेल . सारांश एवढाच निघतो की ही याचिका म्हणजे लोकसभा निवडणुकीपूर्वीची राजकीय ध्रुवीकरणाची एक महत्वपूर्ण खेळी म्हणावी लागेल. अतिशय विचारपूर्वक आणि राजकीय फायद्याचा विचार करूनच हा डाव टाकला गेलेला स्पष्टपणे दिसून येतो.

### कोर्टाच्या तंबूत चेंडू

राजकीय सारीपाटावर पुन्हा एकदा राममंदिराचे प्यादे सरकवले गेले आहे. सर्वोच्च न्यायालय याबाबतीत ठोस निर्णय घेईल अशी अपेक्षा होती. ३० जानेवारीपासून याबाबतची दैनंदिन सुनावणीही सुरू होणार होती. परंतु न्यायाधिशांच्या अनुपस्थितीमुळे ती पुन्हा पुढे ढकलली गेली. या कारणामुळे सर्वोच्च न्यायालयाला राम मंदिर हा तितकासा गंभीर मुद्दा वाटत नाही. असा प्रचार विश्वहिंदू परिषद आणि भाजपाला सहजपणे करता येतो. खरे तर आता ज्या जागेसंदर्भात केंद्र सरकारने याचिका दाखल केली आहे तशा प्रकारची मागणी केंद्र सरकारने यापूर्वी का नाही केली. असा प्रश्न निर्माण होतो किंवा ती आताच लोकसभा निवडणुकीपूर्वी करण्याचे कारण काय असाही मुद्दा उपस्थित होतो. परंतु सुप्रीम कोर्टाने जर राममंदिराच्या बांधकामाला परवानगी दिली असती तर या अविवादित जागेचा वेगळा विचार करण्याची सरकारला गरजही पडली नसती. असे उत्तर सरकारकडून दिले जाऊ शकते. म्हणजे पुन्हा सर्वोच्च न्यायालयाच्या तंबूमध्ये चेंडू टाकून सरकार आपण कसे राममंदिराच्या पूर्णपणे बाजूचे आहोत हे सिध्द करू इच्छित आहे. राममंदिर व्हायला हवे, हिंदूंच्या या एकमेव मागणीची सन्मानाने पूर्तता व्हायला हवी याबद्दल कोणाचेही दुमत नाही. परंतु रामासारख्या दैवताचे राजकारणासाठी जेव्हा प्यादे केले जाते. तेव्हा मात्र आपल्या देशातील राजकारणाचा स्तर हा किती घसरू शकतो हे सिध्द होते.